# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन, २०२२

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### राज्यात विद्यार्थी आत्महत्या रोखण्याबाबत

**(१) १४२० (१८-०३-२०२०) श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात बदललेली शिक्षणपध्दती, प्रवेशातील शर्यतीची भिती, बेरोजगारी, विद्यार्थ्यांवरील तणाव, शैक्षणिक अपयश इत्यादी कारणांनी सर्वाधिक १४४८ विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याचे नॅशनल क्राईम रेकॉर्डस ब्युरोच्या अहवालातून माहे जानेवारी, २०२० च्या प्रथम सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामध्ये ८ टक्के विद्यार्थ्यांची संख्या असून, बेरोजगारीला कंटाळून आत्महत्या करणाऱ्यांची संख्या ही १० टक्के आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन आत्महत्या रोखण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (०४-०२-२०२२) :** (१) हे खरे आहे. “क्राईम इन इंडिया २०१८” हा अहवाल दिनांक ०७/०१/२०२० रोजी प्रकाशित झाला आहे. सदर अहवालानुसार महाराष्ट्रात पुरुष विद्यार्थी ८०४ व महिला विद्यार्थी ६४४ असे एकूण १४४८ विद्यार्थ्यांनी आत्महत्या केली आहे.

(२) आत्महत्या करणाऱ्यांपैकी ८% विद्यार्थी व ७% बेरोजगारीला कंटाळून आत्महत्या करणारे आहेत.

(३) सदरहू आत्महत्या रोखण्याच्या अनुषंगाने शासनाने बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क २००९ चे कलम १६ व १७ नुसार खालील तरतूदी केलेल्या आहेत :-

अ) कलम १६ : शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास कोणत्याही इयत्तेत मागे ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतून काढून टाकता येणार नाही.

ब) कलम १७ : कोणत्याही बालकास शाळेत शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देता येणार नाही.

तसेच दहावी व बारावीच्या निकालाच्या वेळेस विद्यार्थ्यांना महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळ यांचेकडून समुपदेशन सुविधा उपलब्ध केली जाते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्र मत्स्य उद्योग विकास महामंडळाने मुंबई पोर्ट ट्रस्टच्या मालकीच्या ससून डॉकच्या गोडाऊनचे भाडे थकविल्याबाबत

**(२) ३०६२ (०२-०६-२०२०) श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.विनायकराव मेटे, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई पोर्ट ट्रस्टच्या मालकीची ससून डॉकमध्ये असलेली २२ गोडाऊन महाराष्ट्र मत्स्योद्योग महामंडळाने मत्स्य व्यावसायिकांना भाडे तत्वावर दिली आहेत, सदर गोडाऊनमध्ये मत्स्य व्यावसायिक मासळीचे पॅकिंग करुन निर्यात करतात, तथापि या गोडाऊनचे व्यावसायिकांनी दिलेले भाडे महाराष्ट्र

मत्स्य उद्योग विकास महामंडळाने पोर्ट ट्रस्टकडे भरलेले नाही, त्यामुळे सदर गोडाऊन रिकामे करण्याच्या नोटीसा दिल्यामुळे गोडाऊन बंद होऊन मत्स्य व्यवसायाशी संबंधित असलेल्या ५० हजारांहून अधिक कामगारांवर बेरोजगार होण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अस्लम शेख (३१-०१-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सोलापूर जिल्ह्यात रमाई आवास योजनेमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(३) ३६६४ (०२-०६-२०२०) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यात रमाई आवास योजना नगरपालिका हद्दीत संपूर्णपणे असफल झालेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोलापूर जिल्ह्यातील एकूण १२ नगरपालिका हद्दीमध्ये ९७२२ घरांचे उद्दिष्ट असून त्यापैकी ४००० घरकुले मंजूर असून फक्त ७०० घरकुले पूर्ण झालेली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे अनेक गरजूंना त्यांच्या हक्काच्या घरापासून वंचित राहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (२०-१२-२०२१) :** (१) व (२) हे खरे नाही.

सोलापूर नगरपालिका क्षेत्रासाठी ९७२२ इतके घरकुल लाभार्थ्यांचे उद्दीष्ट मंजूर करण्यात आलेले आहे. त्यापैकी घरकुल निर्माण समितीने ४०२७ घरकुलांना मंजूरी प्रदान केली आहे. यापैकी ७०४ घरकुलांचे बांधकाम पूर्ण झाले असून १९७२ घरकुलांचे बांधकाम अंतिम टप्यात आहे. तसेच ५७४ लाभार्थ्यांच्या प्रस्तावास जिल्हा स्तरावरील गठीत केलेल्या समितीमार्फत छाननी करून पात्र लाभार्थ्यांना घरकुल मंजूरीबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बुलढाणा जिल्हा परिषदेमधील केंद्र प्रमुख या पदाच्या पदोन्नती व वेतनवाढीबाबत

**(४) ५१५५ (१४-१२-२०२०) अॅड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषदमधील केंद्र प्रमुख हे पद प्राथमिक शिक्षण विभागात पदोन्नतीचे व अधिक कर्तव्य जबाबदारीचे असल्याने १० ते १२ शाळांच्या कार्यक्षेत्रामध्ये पर्यवेक्षण करणारे महत्त्वाचे पद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुख्य कार्यकारी अधिकारी, बुलढाणा जिल्हा परिषद यांनी दिनांक २१ जून, २०१८ रोजी पत्र क्र.१४८८/१८ नुसार ग्रामविकास विभागास पाठविलेल्या पत्रामध्ये केंद्र प्रमुख हे पद पदोन्नतीचे असून अधिक कर्तव्य व जबाबदारीचे पद असल्याचे नमूद करून सदर पदास या पदाची पदोन्नतीची वेतनवाढ म.ना.से. नियम वेतन १९८१(११)(१)(अ) नुसार देऊन निश्चित करण्याची विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनस्तरावर सदर पत्रावर अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही न झाल्याने बुलढाणा जिल्हा परिषदमधील कार्यरत व सेवानिवृत्त केंद्र प्रमुखांची विविध प्रकरणे नामंजूर होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बुलढाणा जिल्हा परिषद प्रशासनाने पाठविलेल्या पत्रावर अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही न करण्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्याअनुषंगाने जिल्ह्यातील कार्यरत व सेवानिवृत्त केंद्र प्रमुखांना न्याय देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (१४-०१-२०२२) :** (१), (२), (३), (४), (५) व (६) जिल्हा परिषदेमधील केंद्रप्रमुख हे पद पदोन्नतीचे असून त्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रात १० ते १२ शाळांचे पर्यवेक्षण करावे लागते हे खरे आहे. केंद्रप्रमुख हे पदोन्नतीचे पद अधिक कर्तव्य व जबाबदारीचे असल्याने पदोन्नतीची वेतनवाढ महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ च्या नियम क्रमांक ११(१)(अ) नुसार देवून निश्चित करावी किंवा कसे याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा यांनी त्यांच्या दिनांक २१/०६/२०१८ च्या पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावावर कार्यवाही चालु आहे.

---

## औरंगाबाद शहरातील दलित वस्ती सुधार योजनेतील विजेचे खांब गहाळ झाल्याबाबत

**(५) ५३१७ (१४-१२-२०२०) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद शहरातील दलित वस्ती सुधार योजनेतील ११९ विजेचे खांब गायब झाल्याची तक्रार महावितरणकडे प्राप्त झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (२७-०१-२०२२) :** (१) हे खरे नाही. सदर भागात उभ्या केलेल्या पोलबाबत दिनांक ०४/०३/२०२०, दिनांक २८/०९/२०२० व दिनांक २९/०९/२०२० अन्वये तक्रार अर्ज महावितरणच्या विभागीय कार्यालयास प्राप्त झालेले आहेत. औरंगाबाद महानगरपालिकेने त्यांच्या क्षेत्रातील विविध

कामाकरीता महावितरणला केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने महावितरणद्वारा पहाणी करुन २१९ पोलचे रुपये ११९.३७ लाखांचे अंदाजपत्रक सादर केले. परंतु मनपा, औरंगाबाद यांच्या सोबत चर्चा करुन व प्राधान्यक्रमानुसार १२२ पोलकरीता रक्कम रुपये ५९.१५ लक्ष इतक्या रकमेचे अंदाजपत्रक पुन:प्रस्तावित केले. सुधारित अंदाजपत्रकानुसार १२२ पोलच्या कामासाठीचा निधी प्राप्त झाला व तेवढे काम करण्यात आले.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बेंडगाव व कळमदेवी (ता.डहाणू, जि.पालघर) दुर्गम भागात वीज जोडणी देण्याबाबत

**(६) ८३९७ (१५-०६-२०२१) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बेंडगाव व कळमदेवी (ता.डहाणू, जि.पालघर) या दुर्गम भागातील सुमारे १३० कुटुंबियांनी घरात विद्युत जोडणी मिळावी याकरीता विद्युत मीटरची रक्कम भरुन एक वर्षाचा कालावधी होवूनही आजमितीपर्यंत सदर कुटुंबे अंधारातच रहात असल्याची बाब दिनांक १२ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने बेंडगाव व कळमदेवी या दुर्गम भागातील १३० कुटुंबियांना वीज जोडणी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (२७-०१-२०२२) :** (१) हे खरे नाही.

दिनांक १२ मे, २०२१ रोजी लोकसत्ता वृत्तपत्रात आलेल्या बातमीची तथ्यता तपासली असता, त्यावेळी महावितरणकडे नवीन वीज जोडणीसाठी कोणताही अर्ज प्रलंबित नव्हता. बेंडगावमध्ये २ रोहित्रांमधून ५५ ग्राहकांना व कळमदेवी मध्ये एका रोहित्रामधून ९३ ग्राहकांना वीज पुरवठा केला जातो.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

३० अर्ज कळमदेवी येथील वाढीव लोकवस्तीमधून प्राप्त झालेले नाहीत. परंतु वाढीव लोकवस्तीकरीता ग्रामपंचायतीकडून नवीन विद्युत पायाभूत सुविधाकरीता अर्ज प्राप्त झाल्यानंतर सर्वे करून DPDC मध्ये प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर व निधी मिळाल्यानंतर कामे पूर्ण झाल्यावर/ अर्ज प्राप्त करून घरांना विद्युत पुरवठा केला जातो.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर जीवन प्रकाश योजनेमध्ये ओबीसींचा समावेश करण्याबाबत

**(७) ९३३५ (०९-०६-२०२१) श्री.अभिजित वंजारी, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर जीवन प्रकाश योजनेच्या माध्यमातून अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांसाठी विशेष वीज जोडणी मोहिम दिनांक १४ एप्रिल, २०२१ रोजीपासून सुरु करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेमध्ये ओबीसी प्रवर्गाचा समावेश करण्यात न आल्याने खेड्यापाड्यात ओबीसी समाजातील कुटुंबाना वीज जोडणी मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, डॉ.बाबासाहेब आंबेडकर जीवन प्रकाश योजनेमध्ये ओबीसींचा समावेश करण्याबाबत व त्यास घरगुती वीज जोडणी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (२७-०१-२०२२) :** (१) हे खरे आहे. दिनांक १४ एप्रिल, २०२१ ते ६ डिसेंबर, २०२१ या कालावधीत अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील अर्जदारांना प्राधान्याने महावितरणद्‌वारे घरगुती ग्राहकांसाठी वीज

जोडणी उपलब्ध करुन देण्यासाठी "डॉ.बाबासाहेब आंबेडकर जीवन प्रकाश योजना" राबविण्याबाबत दिनांक १२/०४/२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे.

(२) हे खरे नाही. सदर योजनेत ओबीसी प्रवर्गाचा समावेश नसला तरी महावितरणच्या विविध योजनेंतर्गत ओबीसी सहित इतर प्रवर्गास वीज जोडणी देण्यात येते.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नवी मुंबई/ ठाणे येथे मासेमारी पास/ परवाने मिळविण्यासाठी कार्यालय सुरु करण्याबाबत

**(८) ९८७९ (२१-०६-२०२१) श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.सुधीर तांबे, श्री.जयंत आसगावकर, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.मोहनराव कदम : तारांकित प्रश्न क्रमांक ७०६९ ला दिनांक २ मार्च, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे व पालघर जिल्ह्यासाठी मासेमारी पास/परवाने मिळणेसाठी स्वतंत्र जिल्हा कार्यालय निर्माण करणे व सदर कार्यालयासाठी पदनिर्मिती करण्याच्या प्रस्तावावर शासनाने निर्णय घेऊन कार्यवाही पूर्ण केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अस्लम शेख (२८-१२-२०२१) :** (१), (२) व (३) ठाणे/ पालघर जिल्ह्यासाठी स्वतंत्र जिल्हा कार्यालय निर्माण करणे व सदर कार्यालयासाठी पदनिर्मिती करण्याच्या प्रस्तावावर शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात महावितरण कंपनीच्या ग्राहकांनी देयके थकविल्यामुळे महावितरण कंपनीचे आर्थिक नुकसान होत असल्याबाबत

**(९) ९९४४ (१७-०६-२०२१) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, अॅड.निरंजन डावखरे, श्री.प्रवीण दटके, डॉ.परिणय फुके, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रमेश कराड :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महावितरण कंपनीची मागील ७ वर्षांत सुमारे रुपये ७१ हजार कोटींच्या वर थकबाकी गेल्याचे निवेदन महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसीटी वर्कर्स फेडरेशनने मा.मुख्यमंत्री महोदयांना दिले असल्याची बाब माहे मार्च, २०२१ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोनाकाळात विजेच्या दरात झालेली प्रत्यक्ष वाढ, विजेचा जास्त वापर, प्रत्यक्ष रिडिंग झाल्यानंतर देण्यात आलेले वाढील वीज बील इ. कारणास्तव बहुसंख्य ग्राहकांनी वीज बील भरणे बंद केले असल्याने महावितरण कंपनीचे आर्थिक नुकसान होऊन कंपनी डबघाईस आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महावितरण कंपनीककडून ३०० युनिटपर्यंत पूर्वी देण्यात येणारी सवलत केवळ १०० युनिटपर्यंत दिल्याने आणि मिटरच्या मासिक निश्चित शुल्कात वाढ केली असल्यामुळे सरकारी वीज शुल्क आणि वीज विक्रीवर शासनाने कर लावल्यामुळे ग्राहकांना जास्तीचे वीज बील भरावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मा.ऊर्जा मंत्री महोदयांनी दिलेल्या आश्वासनाप्रमाणे ३०० युनियटपर्यंत मीटर भाडे, शासकीय वीज शुल्क आणि वीज विक्रीकर सवलत देण्यात येणार आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने महावितरण कंपनी व ग्राहक यांच्यात विजेच्या देयकासंदर्भात साधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (२७-०१-२०२२) :** (१) हे खरे आहे. महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसीटी वर्कर्स फेडरेशनचे दिनांक २२/०३/२०२१ रोजीची निवेदन महावितरण कार्यालयास प्राप्त झालेले आहे.

(२) कोरोना कालावधीत विविध कारणास्तव महावितरणची जून, २०२१ अखेरची Provisional थकबाकी रुपये ६१,७९८ कोटी इतकी आहे.

(३) हे खरे नाही.

(४) शासन निर्णय, दिनांक २२/०४/२०२० अन्वये वीज धोरण ठरविण्याबाबत समिती गठीत करण्याचा निर्णय घेतलेला आहे. सदर निर्णयानुसार स्थापन केलेल्या समितीच्या कार्यकक्षेत राज्यातील ० ते १०० युनिट विजेचा वापर असणाऱ्या घरगुती ग्राहकांना मोफत वीज द्यावी अथवा नाही ही बाब अंतर्भूत करण्यात आलेली आहे.

(५) ग्राहकांना वीज देयकाबाबत शंका असल्यास ते महावितरण कंपनीच्या स्थानिक कार्यालयाशी संपर्क साधून अथवा महावितरणच्या Online संपर्क माध्यमांद्वारे (call centers, Mobile App. WSS किंवा Call Facility इत्यादी) आपली तक्रार नोंद करु शकतात. सदर तक्रारींचे त्वरीत निरसन केले जाते. तसेच देयकांमध्ये काही त्रुटी आढळल्यास त्या त्वरित दुरुस्त करुन देण्यात येतात.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आचरा (जि.सिंधुदुर्ग) पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविण्यास दुर्लक्ष करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(१०) १०१८६ (०६-१०-२०२१) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालडी (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) येथील एका ग्रामस्थाने विद्युत कंपनीच्या कर्मचाऱ्यास कर्तव्यावर असताना शिवीगाळ आणि धमकी देवून शासकीय कामकाजात अडथळा आणण्याचा प्रकार दिनांक १९ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित वीज कर्मचाऱ्याने या घटनेची तक्रार आचरा पोलीस ठाण्यात केली असता पोलीस ठाण्यातील संबंधित अधिकाऱ्यांनी तक्रार नोंदविण्यात दिरंगाई केली असल्याची तसेच सदर प्रकरणी शासकीय कामकाजात अडथळा आणल्याबाबतचा गुन्हा दाखल न करता सुमारे २२ दिवसांनी हेतुपुरस्कर केवळ अदखलपात्र गुन्हा दाखल करुन घेतल्याचा प्रकार निदर्शनास आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर प्रकरणी दखलपात्र गुन्हा दाखल करुन घेण्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या आचरा पोलीस ठाण्यातील संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर तसेच शासकीय कामात अडथळा आणणाऱ्या संबंधित इसमाविरुध्द नियमानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (२५-०१-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) सदर प्रकरणी वीज कर्मचारी यांनी दिनांक ११/०६/२०२१ रोजी आचरा पोलीस ठाणे जि.सिंधुदूर्ग येथे दिलेल्या तक्रारीवरुन अदखलपात्र गुन्हा रजि.नं. ५३/२०२१ कलम ५०४, ५०६ भादंवि अन्वये नोंदविण्यात आला आहे. तसेच संबंधित इसमाविरुध्द दिनांक १८/०६/२०२१ रोजी कलम १४९ फौ.प्र.सं. अन्वये शातंता राखण्याबाबत नोटीस बजावण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, कणकवली, सब स्टेशन, मालवण, प्रभारी अधिकारी, आचरा यांनी कळविल्यानुसार तक्रारदार (संबंधित वीज कर्मचारी) हे कोल्हापूर विद्युत ॲप्रेंटीस स्वयंरोजगार सहकारी संस्था मर्यादीत, कोल्हापूर या संस्थेमार्फत बाहयस्त्रोत कर्मचारी म्हणून महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी शाखा कणकवली सब स्टेशन, विरण आचरा, ता.मालवण येथे कार्यरत असून शासकीय नोकर अथवा लोकसेवक नाहीत. तसेच सहाय्यक संचालक व सरकारी अभियोक्ता, सिंधुदुर्ग-ओरोस यांनी तक्रारदार हे लोकसेवक या संज्ञेत येत नसल्याने सरकारी नोकरास शासकीय कामात अडथळा या प्रकरणी भादवि कलम ३५३ प्रमाणे दखलपात्र गुन्हा लागु होणार नाही असे मत दिल्याने या प्रकरणी अदखलपात्र गुन्हा दाखल केला आहे.

(३) सदर प्रकरणी तक्रारदार हे शासकीय नोकर अथवा लोकसेवक या संज्ञेत येत नसल्याने अदखलपात्र गुन्हा नोंदविण्यात आला असून तक्रारदार यांना मा.न्यायालयात दाद मागण्यासाठी लेखी समज देण्यात आली आहे. संबंधित इसमाविरुध्द दिनांक १८/०६/२०२१ रोजी कलम १४९ फौ.प्र.सं. अन्वये शातंता राखण्याबाबत नोटीस बजावण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील हजेरी सहाय्यकांना सेवा निवृत्तीवेतन देणेबाबत

**(११) ११२९० (०६-०१-२०२२) श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाच्या समन्यायी तत्वाचे आदेश व सेवानिवृत्ती संबंधी मा.सर्वोच्च न्यायालय व मा.उच्च न्यायालयाचे आदेश निदर्शनास आणून देऊन राज्यातील हजेरी सहाय्यकांना सेवा निवृत्तीवेतन मिळण्यासाठी रोजगार हमी योजना विभागाचे अवर सचिवांसोबत झालेल्या बैठकीत निर्णय झाला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन हजेरी सहाय्यकाना सेवा निवृत्तीवेतनाचा लाभ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे (०४-०२-२०२२) :** (१) व (२) मा.मंत्री (रोहयो) यांच्या अध्यक्षतेखाली मा.लोकप्रतिनिधी व संघटनेचे पदाधिकाऱ्यासमवेत दिनांक २१/०९/२०२१ रोजी बैठक झाली. उक्त बैठकीमध्ये उपस्थितींना मा.सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे शासनाच्यावतीने विशेष अनुमती याचिका (P.L.I.) दाखल असल्याचे अवगत करण्यात आले आहे. शासन सेवेत समावेशन झाल्यानंतर १० वर्षांची अर्हताकारी सेवा सेवानिवृत्तीकरीता ग्राहय धरण्यात येते. सबब हजेरी सहाय्यकांचे समावेशन झाल्यानंतर त्यांची शासकीय सेवा १० वर्षाची झाल्यानंतर त्यांना सेवानिवृत्ती वेतन लागू होते. हजेरी सहाय्यकांचे समावेशन होण्यापूर्वीची हजेरी सहाय्यक पदावरील सेवा शासकीय सेवा नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अकोलखेड (जि.अकोला) महसूल मंडळाला पीक विम्याच्या लाभापासून वंचित ठेवल्याबाबत

**(१२) ११४२५ (०६-०१-२०२२) श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.संजय दौंड :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोलखेड (जि.अकोला) महसूल मंडळातील सन २०१९-२०२० च्या संत्रा पिकाचा विमा उतरविलेला असूनही अकोलखेड मंडळाला हवामान (वेदर) स्टेशनचे कारण (हवाला) देऊन संबंधित अधिकाऱ्यांच्या संगनमताने विम्याच्या लाभापासून वगळण्यात आल्याने शेतकरी फळपीक विम्याच्या लाभापासून वंचित राहिल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधित शेतकऱ्यांनी पालकमंत्री, अकोला, लोकप्रतिनिधी, अकोला, जिल्हाधिकारी, अकोला, उपविभागीय अधिकारी (एस.डी.ओ.), अकोला, तहसिलदार, अकोला, जिल्हा कृषी अधिकारी, अकोला व संबंधित विभाग यांचेकडे निवेदने देऊनही कोणतीही कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शेतकऱ्यांना फळपीक विम्याच्या लाभापासून वंचित ठेवणाऱ्या दोषींवर कारवाई करुन शेतकऱ्यांना विम्याचा लाभ देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०३-०२-२०२२) :** (१) नाही, हे खरे नाही.

(२) सदर प्रकरणी संबंधित शेतकरी व लोकप्रतिनिधी यांचेमार्फत निवेदने प्राप्त झाली होती.

शासन निर्णय दिनांक २२ मे, २०१९ नुसार या योजनेतंर्गत महावेध प्रकल्पातंर्गत स्थापित संदर्भ हवामान केंद्रावर नोंदविल्या गेलेल्या हवामानाची आकडेवारी व अधिसुचित फळपिकांचे हवामान धोके यांची सांगड घालून सहभागी विमा कंपनीमार्फत शेतकऱ्यांना नुकसान भरपाई अदा करण्यात येते. परंतु मृग बहार सन २०१९ मध्ये स्वयंचलित हवामान केंद्रावर नोंदविल्या

गेलेल्या आकडेवारीनुसार अकोलखेड महसूल मंडळात संत्रा फळपिकासाठी कोणताही हवामान धोका लागू न झाल्यामुळे सहभागी शेतकऱ्यांना विमा कंपनीमार्फत नुकसान भरपाई अदा करण्यात आलेली नाही.

आंबिया बहार सन २०१९-२०२० मध्ये अकोलखेड महसूल मंडळात सहभागी ९०७ शेतकऱ्यांना संत्रा या फळपिकासाठी रक्कम रुपये ३९०.०० लाख इतकी विमा नुकसान भरपाई विमा कंपनीमार्फत अदा करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## तारासावंगा-वडेगाव तसेच बेलोरा (बु) ते जोलवाडी (ता.आष्टी, जि.वर्धा) येथील पाणंद रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत

**(१३) ११५८१ (०६-०१-२०२२) श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तारासावंगा-वडेगाव तसेच बेलोरा (बु) ते जोलवाडी (ता.आष्टी, जि.वर्धा) येथील पाणंद रस्त्याची दुरवस्था झाल्याने उपरोक्त परिसरातील शेतकऱ्यांना शेतात जाणे-येणे गैरसोयीचे होत असल्याचे दिनांक २५ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर पाणंद रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे (०४-०२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) तारासावंगा-वडेगाव या पाणंद रस्त्याचे काम सन २०१२-२०१३ या वित्तीय वर्षात मग्रारोहयो अंतर्गत १ कि.मि. मातीकाम पूर्ण झालेले आहे. तसेच बेलोरा (बु) ते जोलवाडी येथील काम सन २०११-२०१२ या वित्तीय वर्षात १ कि.मी. मातीकाम पूर्ण करण्यात आलेले आहे. तथापि, सदर मातीकाम खराब झाल्याने शेतकऱ्यांची जाणे येण्याची गैरसोय होत असल्यामुळे ग्रामपंचायतींनी सदर कामांचा वार्षिक कृती आराखड्यात समावेश केल्यास सदर कामे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमधून पूर्ण होऊ शकतात.

शासन निर्णय दिनांक ११/११/२०२१ अन्वये मातोश्री ग्रामसमृद्धी शेत/ पाणंद रस्ते योजना विहित करण्यात आली आहे. मनरेगा आणि राज्य रोहयो यांच्या अभिसरणातुन शेत/ पाणंद रस्त्यांच्या कामांकरीता पूरक कुशल निधी उपलब्ध करुन देण्यात येतो. सदर योजनेंतर्गत उक्त प्रस्ताव विहित पध्दतीने प्राप्त झाल्यास सदर शेत/ पाणंद रस्त्यांची कामे करता येतील.
(३) निरंक.

---

## रत्नागिरी जिल्हयात नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीची भरपाई मिळण्याबाबत

**(१४) ११६६२ (२५-११-२०२१) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जलप्रलयासह दरडी कोसळून झालेल्या नैसर्गिक आपत्तीमुळे माहे जुलै, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान रत्नागिरी जिल्हयात कोट्यवधीचे नुकसान झाले व मा.मुख्यमंत्र्यांनी मदतीसाठी निकष जाहीर केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बाधित दुकानदारांना नुकसानीपोटी ७५ टक्के किंवा ५० हजार रुपये मदत दिली जाणार आहे मात्र अजूनही याबाबतचा शासन निर्णय आलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नवीन शासन निर्णय प्राप्त झाल्यानंतरच वाढीव निधी, व्यापाऱ्यांच्या नुकसानापोटी जाहीर झालेल्या मदतीची मागणी जिल्हा प्रशासनाकडून केली जाणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोकणातील (जि.रत्नागिरी) येथील नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीची मदत देण्याबाबतचा शासन निर्णय अद्याप न काढण्याची कारणे काय आहेत तसेच उक्त शासन निर्णय तातडीने काढून नुकसानग्रस्तांना दिलासा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे, वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार (०२-१२-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

बाधित दुकानदारांना व टपरीधारकांना नुकसानीपोटी अनुक्रमे ७५ टक्के किंवा ५० हजार रुपये व ७५ टक्के किंवा १० हजार मदत देण्याबाबत दिनांक ११/०८/२०२१ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. सदर शासन निर्णयातील तरतूदीनुसार दुकानदार व टपरीधारक यांना द्यावयाच्या मदतीचे निकष शिथिल करण्याबाबत दिनांक १७/११/२०२१ रोजी सुधारित शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## आदिवासी विभागातील विविध योजनांमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१५) ११६७४ (१९-११-२०२१) श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी भागांमध्ये सन २००४ ते २००९ या कालावधीत ४५६ योजनांमध्ये सहा हजार कोटीचा गैरव्यवहार झाला असून सदर गैरव्यवहारासंदर्भात दोन आदिवासी बांधवानी मुंबई उच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल केल्यामुळे या सर्व गैरव्यवहाराची एमजी गायकवाड समितीमार्फत चौकशी करुन तीन हजार पानांचा अहवाल शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी भागातील एकूण १६ जिल्हयांतील २४ पैकी २३ प्रकल्पामध्ये अधिकारी गैरव्यवहारामध्ये दोषी आढळले असून सदर दोषी अधिकाऱ्यांविरुध्द शासनाने कोणतीच कारवाई केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आदिवासी मुलींसाठी असणाऱ्या विविध सोई सुविधांबाबत खोटे नाव दाखूवन पैशांचा अपहार केला असून त्याप्रकरणी अनेक कंत्राटदार, संस्था यांना काळ्या यादीत (ब्लॅक लिस्ट) टाकून संस्थांची संचालक मंडळेदेखील बरखास्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली,

(४) असल्यास, आदिवासी विभागास मिळणारा निधी परस्पर दुसऱ्या खात्यात वर्ग केल्यामुळे तसेच आदिवासी भागांमध्ये झालेल्या गैरव्यवहारामुळे आदिवासी बांधवांना सर्व सोई-सुविधा/लाभापासून वंचित राहावे लागत असल्यामुळे आदिवासींना सर्व योजनांचा लाभ मिळण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (०६-१२-२०२१) :** (१) होय.

सन २००४ ते २००९ या कालावधीत आदिवासी विकास विभागामार्फत राबविण्यात आलेल्या विविध योजनांमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत, मा.उच्च न्यायालयामध्ये दाखल करण्यात आलेल्या याचिकेवरील सुनावणीवेळी, मा.न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार, मा.न्या.श्री.एम.जी.गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठित करण्यात येऊन, याबाबत चौकशी करण्यात आली असून, सदर समितीने आपला चौकशी अहवाल मा.न्यायालयास व शासनास सादर केला आहे.
(२) हे खरे नाही.

न्या.गायकवाड समितीने सादर केलेल्या चौकशी अहवालामधील शिफारशीनुसार, संबंधित अधिकारी/ कर्मचाऱ्यांविरुध्द शासनाने संबंधित पोलीस स्टेशनमध्ये तक्रारी दाखल केल्या असून, पुढील तपास सुरू आहे. तसेच, संबंधित अधिकारी/ कर्मचाऱ्यांविरुध्द शिस्तभंगविषयक कार्यवाहीदेखील सुरू केली आहे.
(३) न्या.गायकवाड समितीने सादर केलेल्या चौकशी अहवालामधील, एकूण १०५ विविध संस्था/ खाजगी पुरवठादार यांना काळ्या यादीमध्ये टाकण्यात आले आहे.
(४) यानुषंगाने विभागामार्फत विविध उपाययोजना हाती घेण्यात आल्या असून, यामध्ये आश्रमशाळांकरीता मध्यवर्ती स्वयंपाकगृह, अनुदानित पोर्टल, आदीग्राम पोर्टल, आश्रम शाळा डीबीटी, स्वयंम योजना, पेसा फंड व्यवस्थापन, ई-ट्राइब, स्कॅनिंग आणि डिजिटलायझेशन इ. बाबींचा समावेश करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पालघर व ठाणे जिल्ह्यातील भातखरेदी योजनेमध्ये बारदान वितरणात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१६) ११६७९ (२५-११-२०२१) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर व ठाणे जिल्ह्यातील आदिवासी विकास महामंडळामार्फत राबविल्या जाणाऱ्या सन २०२०-२०२१ मधील आधारभूत भातखरेदी योजनेत भात वाहतूक, धान खरेदी व बारदान वितरणामध्ये तीन कोटी रुपयाचा गैरव्यवहार झाल्याचे दिनांक ३ नोव्हेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पालघर व ठाणे जिल्ह्यामध्ये सहा लाख ६८ हजार ८१६ क्विंटल भाताची आधारभूत केंद्रावर खरेदी झाली असून चार लाख ४१ हजार ३८ क्विंटल भाताच्या भरडाईपैकी दोन लाख ९५ हजार ४९५ क्विटल तांदूळ प्राप्त झाला असून त्यातील दोन लाख ६० हजार ३३२ क्विंटल तांदूळ गोदामध्ये आहे. तसेच भरडाईमुळे प्राप्त झालेला तांदूळ हा नवीन बारदानामध्ये भरणे अपेक्षित असल्यामुळे तांदूळ भरण्यासाठी सात लाख नवीन बारदानाची खरेदी झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पालघर व ठाणे जिल्ह्यास साडेसहा लाख नवीन बारदानाचा पुरवठा करणे आवश्यक असतानाही आदिवासी विकास महामंडळाच्या अधिकारी/कर्मचारी यांच्या संगनमताने खरेदी केलेल्या बारदानापैकी साडे सहा लाख नवीन बारदानाची परस्पर विक्री केली असून कोणत्याही केंद्रावर तपासणी केली असता नवीन बारदानामध्ये धान आढळून आले नाही. तसेच कागदावरच नवीन बारदानाच्या नोंदी असून शासनास कळविलेल्या बारदानाच्या आकडेवारीपेक्षा २० टक्के बारदान केंद्रावर उपलब्ध झाल्याचे निदर्शनास आले आहे,

(४) असल्यास, भाताची भरडाई स्थानिक पातळीवर न देता भरडाईसाठी त्यांना दूरच्या ठिकाणी जावे लागत असल्यामुळे वाहतुकीपोटी अतिरिक्त होणारा दीड कोटी रुपयाचा खर्च तसेच जुन्या बारदानात तांदुळ भरण्याची नामुष्की गिरणी मालकांवर ओढवली असून झालेला गैरप्रकार निदर्शनास येऊ नये म्हणून केंद्र व गिरणी चालकांनी नियमाचे उल्लघंन केल्याचे दर्शवून अधिकाऱ्यांकडून कारवाईची भिती दाखवून नवीन बारदान प्राप्त झाले

नसतानाही बारदान प्राप्त झाल्याच्या स्वाक्षऱ्या घेण्याची वेळ काही खरेदी केंद्र व गिरणी चालकांवर आली असून बारदान खरेदीमध्ये झालेल्या गैरव्यवहाराबाबत आदिवासी एकता मित्र मंडळाचे अध्यक्षांनी चौकशी करण्याची मागणी केली आहे,

(५) असल्यास, आधारभूत भातखरेदी योजनेत भात वाहतूक, धान खरेदी व बारदान वितरणामध्ये झालेल्या गैरव्यवहारची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने जबाबादार असणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (१७-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

पालघर व ठाणे जिल्ह्यात यात एकूण ६५८९१६.०२ क्विं. ची खरेदी झालेली आहे. यापैकी ५८८५२३.५६ क्विं. धानाची भरडाई झाली असून ३९४३१०.७९ क्विं. तांदुळ नविन ७८८६२० नग बारदानामध्ये जिल्हा पुरवठा विभागाकडे हस्तांतरीत करणेत आला आहे. ख.प. हंगाम २०२०-२१ करीता अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या दिनांक २९ सप्टेंबर, २०२० रोजीच्या शासन निर्णयानुसार नवीन एसबीटी बारदाना ७१६००० नग मध्यवर्ती गोदामात पुरवठा केलेला आहे. सदर प्राप्त बारदाना हा धान भरणेसाठी खरेदी केंद्रावर व शासन निर्णयानुसार अग्रीम स्वरुपात तांदुळ जमा करण्याकरीता मिलर्सच्या मागणीनुसार आदेश करुन देण्यात आले आहे. तसेच मिलर्सने अग्रीम स्वरुपात तांदुळ जमा करतांना स्वत:कडील नविन बारदान्यामध्ये देखिल तांदुळ जमा केला आहे.

(३) हे खरे नाही.

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या दिनांक २९ सप्टेंबर, २०२० रोजीच्या शासन निर्णयात अग्रीम स्वरूपात तांदुळ जमा करण्याचे निर्देश असल्याने राईस मिलर्सच्या मागणीनुसार मिलस्तरावर बारदाना पुरवठा करून तांदुळ (सीएमआर) नवीन एसबीटी बारदानात शासकीय गोदामात जमा करण्यात आला आहे. धान खरेदीच्या शासन निर्णयामध्ये आवश्यकता असल्यास शेतकऱ्यांचा बारदाना घेणेबाबत निर्देश असल्याने काही बारदाना शेतकऱ्यांकडून घेण्यात आला आहे.

(४) हे खरे नाही.

स्थानिक राईस मिलर्सकडुन अल्प प्रतिसाद मिळत असल्याने नजिकच्या जिल्ह्यातील राईस मिलर्स कडून किमान २०० कि.मी.च्या अंतरासाठी वाहतूक देयक मंजूर करण्यात येतील या अटीवर अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या दिनांक १३/०९/२०२१ रोजीच्या पत्रानुसार शासनाच्या मान्यतेने जळगाव व औरंगाबाद येथील राईस मिलर्सच्या नावाने डिलीव्हरी आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत.

(५) आदिवासी विकास महामंडळाकडे या संदर्भात काही तक्रारी प्राप्त झाल्या असून त्याची चौकशी आदिवासी विकास महामंडळाकडून करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## उपनिबंधक, सहकारी संस्था, आर-नॉर्थ विभाग, मुंबई कार्यालयाकडून होत असलेल्या अनियमिततेबाबत

**(१७) ११६८६ (२५-११-२०२१) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) न्यु अश्विन को.ऑप.हौ.सो.मर्या., ५१ टी.पी.एस.मार्ग, बाभई, बोरीवली (प.), मुंबई या संस्थेच्या तत्कालिन कार्यकारी मंडळाने विकासक (मे.एम.पी.स्पेस डायनॅमिक्स) यांचे संगनमताने सन २०१५ मध्ये वा त्यादरम्यान पुनर्विकासाचा प्रस्ताव सादर करताना दिनांक ३ जानेवारी, २००९ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील कलम ७९(अ) च्या निदेशांकडे दुर्लक्ष केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त संस्थेतील सभासदांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील कलम २२ व २३ अन्वये उपनिबंधक यांचेकडे दाखल केलेल्या दाव्यांच्या सुनावणीबाबत सभासदांची दिशाभुल करुन दावे प्रलंबित ठेवून अंतिम निर्णय देण्यास जाणीवपूर्वक विलंब केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त संस्थेवर निबंधकांमार्फत नेमण्यात आलेल्या प्राधिकृत अधिकाऱ्याच्या नियुक्तीस संस्थेचे सभासद नसलेल्या व्यक्तींनी आक्षेप घेतल्यामुळे उपनिबंधक, सहकारी संस्था, आर-नॉर्थ विभाग, मुंबई यांचेमार्फत दिनांक १६ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास कोणतीही शहानिहा न करता नव्याने नेमण्यात आलेल्या प्राधिकृत अधिकारी मंडळाच्या नियुक्तीसंदर्भात संस्थेतील सभासदांनी दिनांक २४ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त प्रकरणातील अनियमितता दूर करुन सभासदांच्या दाव्यांबाबत निर्णय देण्यास जाणीवपूर्वक टाळाटाळ करणाऱ्या जबाबदार अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (१५-१२-२०२१) :** (१) नाही.

(२) नाही. तथापि, कोविड १९ च्या प्रार्दुभावामुळे, उपनिबंधक यांच्याकडे सुनावणीस मर्यादा आलेल्या आहेत. याप्रकरणी उपनिबंधक यांनी सुनावणी घेऊन अंतिम आदेश निर्गमित केलेले आहेत.

(३) नाही. तथापि, संस्थेतील सभासदांची लेखी तक्रार दिनांक २४ सप्टेंबर, २०२१ रोजी प्राप्त झालेली आहे. त्यानुसार उपनिबंधक यांनी संबधितांना कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौ.रुई (ता.गेवराई, जि.बीड) येथे रेशीम धागा युनिट निर्माण करण्याबाबत

**(१८) ११६९७ (०६-०१-२०२२) श्री.संजय दौंड :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ.रुई (ता.गेवराई, जि.बीड) गावातील शेतकऱ्यांनी रोहयो व इतर योजनांचा लाभ घेऊन गावात महिन्याला रुपये १ कोटीहून अधिक रकमेचे उत्पन्न देणारे रेशीम उत्पादन करण्यात येत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.रोजगार हमी योजना व फलोत्पादन मंत्री यांनी रुई गावाला भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केल्यानंतर, गावासाठी रेशीम धागा निर्मितीचे युनिट उभारण्याचे दिनांक २९ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास आश्वासन दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मौ.रुई येथे रेशीम धागा युनिट निर्माण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अस्लम शेख (०१-०२-२०२२) :** (१) मौजे रुई, ता.गेवराई, जि.बीड या गावात ३५० एकर क्षेत्रावर तुती लागवड असून त्यापासून साधारणत: १ ते १.५ मेट्रीक टन रेशीम कोषाचे उत्पादन दर महिन्याला होते.

(२) व (३) मा.मंत्री, रोजगार हमी योजना व फलोत्पादन यांनी दिनांक २८ ऑगस्ट, २०२१ रोजी मौजे रुई, ता.गेवराई, जि.बीड, या गावाला भेट दिली. मा.मंत्री, रोजगार हमी योजना व फलोत्पादन यांचा पूर्वनियोजित दौरा नसल्यामुळे त्यावेळी जिल्हा रेशीम कार्यालय, बीड या कार्यालयाचे अधिकारी उपस्थित नव्हते. मा.मंत्री महोदयांनी मौजे रुई, ता.गेवराई, जि.बीड येथे रेशीम धागा निर्मिती युनिट उभारणीबाबत शेतकऱ्यांशी चर्चा केली. तथापि, मौजे रुई येथे रेशीम धागा निर्मिती युनिट उभारण्यासंदर्भातील कोणताही प्रस्ताव प्राप्त झालेला नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुसद (जि.यवतमाळ) येथील रस्त्याच्या कामांमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१९) ४७४२६ (०५-०७-२०१९) डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुसद (जि.यवतमाळ) येथील अनेक गावांमध्ये पंचायत समितीमार्फत करण्यात आलेल्या सिमेंट रस्त्याच्या कामांमध्ये गैरव्यवहार झाल्याचे तसेच रस्त्यांचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याची बाब माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (२४-१२-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) ग्रामपंचायत वरूड येथील सिमेंट रस्त्याच्या बांधकामाच्या अनियमिततेबाबत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने पंचायत समिती स्तरावर त्रिस्तरीय समिती नेमण्यात आली होती. सदर समितीच्या दिनांक १२/०२/२०२० रोजीच्या अहवालानुसार अश्विनपूर येथील सिमेंट रस्त्याच्या बांधकामातील अनियमिततेबाबत त्यास जबाबदार असणारे तत्कालिन ग्रा.पं. सचिव श्री.यु. एल. सोनटक्के, ग्रा.पं. वरूड यांच्याकडून वसुलीस पात्र असलेली रक्कम रुपये ९,८७८/- वसूल करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औद्योगिक वापरासाठी मंजूर केलेल्या आणि उद्योग सुरु नसलेल्या शासकीय जमिनींच्या निवासी/व्यावसायिक वापराबाबत

**(२०) ४८१७२ (०६-०७-२०१९) डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.मोहनराव कदम : तारांकित प्रश्न क्रमांक ४१८७९ ला दिनांक १० जुलै, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औद्योगिक वापरासाठी मंजूर केलेल्या आणि उद्योग सुरु नसल्याने पडून असलेल्या शासकीय जमिनी अधिमूल्य (प्रिमियम) आकारुन इतर कारणांसाठी वापरण्यास मंजूरी देण्याबाबतचा निर्णय शासनाने दिनांक ३० जानेवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास घेतला असून राज्यातील बंद उद्योगांच्या जागा आता निवासी/ व्यावसायिक इमारतींच्या बांधकामासाठी खुल्या होणार आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निर्णयाचे स्वरुप काय आहे, त्यानुसार जमीन वितरणासाठी कोणते निकष निश्चित करण्यात आलेले आहेत व बंद उद्योगांच्या साधारणत: किती जमिनी उपलब्ध होणार आहेत,
(३) असल्यास, उक्त निर्णयामुळे शासनाचा साधारणत: किती आर्थिक लाभ होणार आहे ?

**श्री.बाळासाहेब थोरात (१२-०१-२०२२) :** (१) दिनांक १८/०२/२०१९ च्या शासन निर्णयान्वये औद्योगिक प्रयोजनासाठी मंजूर केलेल्या शासकीय जमिनीचा वापर (नझूल जमिनी वगळून) त्या प्रयोजना ऐवजी अन्य प्रयोजनासाठी करण्यास परवानगी देणेबाबतचे धोरण सुनिश्चित करण्यात आले आहे.
(२) दिनांक १८/०२/२०१९ मधील तरतूदीनुसार औद्योगिक घटकांना औद्योगिक प्रयोजनासाठी प्रदान करण्यात आलेल्या शासकीय जमिनीच्या वापरात बदल करण्यास परवानगी देण्यापूर्वी, अशा जमिनीचा मूळ प्रयोजनासाठी वापर सुरु झाला असणे व जमीन प्रदान केल्यापासून किमान १० वर्षाचा कालावधी पूर्ण झालेला असणे अनिवार्य राहील. त्याचप्रमाणे, अशा जमिनीचा प्रस्तावित औद्योगिकेतर वापर प्रादेशिक नियोजनानुसार किंवा विकास आराखड्यानुसार, तसेच विकास नियंत्रण नियमावलीनुसार व वैधानिक/ प्रशासकीय तरतूदीनुसार अनुज्ञेय असणे आवश्यक असेल.
(३) उपरोक्त दिनांक १८/०२/२०१९ च्या शासन निर्णयामधील तरतूद ही ऐच्छिक असून निरंतर सुरु असणारी प्रक्रिया आहे. सबब नेमका किती आर्थिक लाभ होणार आहे हे सुनिश्चितपणे सांगता येणार नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री.राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.